# जिल्हा एकात्मिक आरोग्य व कु.क. सोसायटी,

## राष्ट्रीय आरोग्य अभियान, जिल्हा परिषद जालना

## कंत्राटी पध्दतीने खालील नमुद पदांकरीता अर्ज मागविण्यात येत आहे

राष्ट्रीय आरोग्य अभियान, जालना अंतर्गत जिल्हास्तर, तालुकास्तर व प्रा.आ.केंद्र स्तरावर विविध कंत्राटी पदे भरण्याकरिता जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी, जिल्हा परिषद, जालना करिता खालील दर्शविल्याप्रमाणे कंत्राटी तत्वावर पात्र उमेदवाराकडून दिनांक १५/०२/२०१९ पर्यंत अर्ज मागविण्यात येत आहे. तरी इच्छुक उमेदवारांनी कार्यालयीन वेळेत सुट्टीचे दिवस वगळुन खालील नमुद केलेलया नमुन्यामध्ये व्यक्तीशः अर्ज सादर करावेत.

| अक्र | पदनाम | मुख्यालय | शैक्षणिकअर्हता | कमाल वयोमर्यादा | एकत्रितमानधनप्रति माह | रिक्त पदे | प्रवर्गनिहाय रिक्तपदांचा तपशील | अनुभव | प्रत्यक्ष मुलाखत व कौशल्य चाचणी ठिकाण | अर्ज करण्याचे ठिकाण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| १ | वैद्यकिय अधिकारी (Full Time NUHM) | न.प. जालना | **1) For Full Time Post :-**MBBS with MMC Registration **2) For Part Time Post:-** MBBS with OBGY, Paediatriation, Anesthesia, Surgeon, Physician etc | कमाल ६१ वर्षे | ४५,००० | २ | अ.जा-१ इमाव-१ | अनुभवास प्राधान्य | जिल्हा प्रशिक्षण केंद्र जिल्हा सामान्य रुग्णालय आवार, जिल्हा रुग्णालय जालना | तालुका आरोग्य अधिकारी तालुका जालना जिल्हा रुग्णालय आवार जालना |
| २ | वैद्यकिय अधिकारी (Part Time NUHM) | | | | २,०००/- प्रति भेट जास्तीत जास्त १४ भेटी | ३ | अर्धवेळ पदास आरक्षण लागु नाही | | | |
| ३ | स्टाफ नर्स (महिला) (NUHM) | न.प. जालना | Completed Course of GNM or B.Sc.Nursing Valid MNC Certificate should be attached with application MNC Certification is must | कमाल ४३ वर्ष | १२,००० | १ | अ. जमाती-०१ | रा.आ.अ. व शासकीय अनुभव असलेल्या उमेदवारास प्राधान्य राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत शैक्षणिक कर्ज घेतले असल्यास प्राधान्य | जिल्हा प्रशिक्षण केंद्र जिल्हा सामान्य रुग्णालय आवार, जिल्हा रुग्णालय जालना | तालुका आरोग्य अधिकारी तालुका जालना जिल्हा रुग्णालय आवार जालना |
| ४ | डाटा मॅनेजर (Data Manager (IDSP) | जिल्हास्तर | Completed Course of Post Graduate in Computer Science Or B.E. in IT or Electronics | कमाल ३८ वर्षे | १५००० | १ | खुला-१ | रा.आ.अ. व शासकीय अनुभव असलेल्या उमेदवारास प्राधान्य | जिल्हा प्रशिक्षण केंद्र जिल्हा सामान्य रुग्णालय आवार, जिल्हा रुग्णालय जालना | रा.आ.अ. आरोग्य विभाग, जि.प. जालना. |

## अटी व शर्ती :-

वरील नमुद सर्व पदे ही राज्यशासनाची पदे नसुन निव्वळ कंत्राटी स्वरुपाची पदे आहेत. सदर पदावर कायमपणाचा हक्क राहनार नाही तसेच या पदांसाठी शासनाचे सेवा नियम लागु नाही.तसेच अर्जदाराला शासकिय नियमित सेवेत सामावुन घेणे बाबत किंवा शासना मार्फत सेवा संरक्षण किंवा सेवा संरक्षणा संबंधि दावा करण्याचे अधिकार राहणार नाहीत.

१) जाहिरातीत नमुद केलेल्या पदाच्या संख्येत बदल होवु शकतो.

२) जाहिरातीत नमुद कमाल वयोमर्यादा अ.क्र. १ व २ पदाच्या राष्ट्रीय आरोग्य अभियान सेवेतील कार्यरत उमेदवाराकरिता कमाल सेवा प्रवेश मर्यादा ५ वर्षापर्यंत शिथील करण्यात येत आहे व अ.क्र. ३ व ४ वर नमुद पदांस अर्जदारास खुल्या प्रवर्गासाठी ३८ वर्षे तसेच मागासवर्गीय प्रवर्गासाठी ४३ वर्षे राहिल.

३) पदासाठीचे मानधन हे एकत्रित मानधन आहे, मंजुर पीआयपीच्या अनुषंगाने मानधन ठरविण्याचे अधिकार निवड समितीने राखुन ठेवले आहे. त्यामध्ये बदल होवु शकतो.

४) अर्जदार हा संबंधित पदासाठी शारिरिक व मानसिक दृष्टया सक्षम असावा तसेच अर्जदारा विरुध्द कोणतेही फौजदारी गुन्हा दाखला झालेला नसावा. तसेच ६० वर्षावरील अर्जदाराकरिता जिल्हा शल्य चिकित्सक प्रमाणित शारिरीक योग्यता (Physical Fitness) चे प्रमाणपत्र अनिवार्य आहे. शासकीय कर्मचारी यांच्यावर पुर्वीच्या शासकीय कर्मचारी कार्यालयात कुठल्याही स्वरुपाचे प्रशासकीय व वित्तीय कार्यवाही, दंडात्मक कार्यवाही किंवा फौजदारी अथवा इतर कुठल्याही गुन्हयांची नोंद नसावी किंवा झालेली नसावी.

५) सदर नियुक्ती ही कंत्राटी स्वरुपाची असुन अ.क्र. १ ते ४ अर्जदारास रुजु दिनांक पासुन ते दिनांक ३१ मार्च २०१९. उपरोक्त पदाकरीता निवड प्रक्रिया ही प्राप्त अर्जाचे संख्येनुसार अर्जाची छाननी करुन पात्र अर्जदारांना मुलाखती साठी बोलविण्यात येईल. गुणानुक्रमे यादी तयार करण्यात येवुन त्यानंतर गुणवत्तेनुसार निवड करण्यात येईल. अनुभवी व उच्च शैक्षणिक अर्हता धारकास प्राधान्य देण्यात येईल. उक्त नमुद प्रत्येक पदासाठी राखीव प्रवर्गाचे उमेदवार पुरेशा संख्येत उपलब्ध न झाल्यास कार्यक्रमाच्या अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने उपलब्ध उमेदवारातुन तात्पुरत्या स्वरुपात खुल्या प्रवर्गातुन नियुक्ती केली जाईल.

६) अ.क्र. १, २ व ३ वैद्यकिय अधिकारी व स्टाफ नर्स या पदांसाठी कौशल्य चाचणी, प्रात्यक्षिक चाचणी व मुलाखतीद्वारे सर्वाधिक गुणांच्या आधारे नेमणुक केली जाईल. तसेच वैद्यकिय अधिकारी अर्धवेळ या पदासाठी स्त्री रोग तज्ञ, बालरोग तज्ञ, भुल तज्ञ, भिषक, शल्य चिकित्सक यांच्य सेवा प्रति भेट रु.२०००/- या प्रमाणे ऑन कॉल बेसिस वर घ्यावयाच्या आहे कृपया उमेदवारांनी नोंद घ्यावी.

७) सदर पदे ही कार्यक्रमांतर्गत पीआयपी सन २०१८-१९ च्या मंजुरीच्या अधिन राहुन भरण्यात येत आहे. सदर प्रकल्प केंद्र शासनाने नामंजुर केल्यास तसेच बंद केल्यास कोणतीही पुर्व सुचना न देता कंत्राटी सेवा आपोआप संपुष्टात येईल याची अर्जदारांनी नोंद घ्यावी.

८) ज्या आशा स्वयंसेविकांनी जीएनएम कोर्स पुर्ण केलेला आहे, त्यांना जीएनएम पद भरतीमध्ये वयाची अट राहणार नाही, राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत जीएनएम कोर्स करण्याकरिता शैक्षणिक कर्ज घेणा-या उमेदवारास सदर पदभरतीमध्ये प्राधान्य देण्यात येईल.

९) सदर प्रक्रियेत बदल करण्याचे अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांचे स्तरावर राखीव असतील.

१०) सदर रिक्त पदांच्या संख्येत तसेच पदस्थापनेच्या ठीकाणा मध्ये बदल होऊ शकतो.

११) मुलाखतीकरीता उपस्थित उमेदवारांना प्रवासभत्ता अथवा इतर कोणताही भत्ता देय राहणार नाही.

१२) सदर रिक्त पदांसाठी आवश्यक पात्रता असलेला अर्जदार न मिळाल्यास किंवा आवश्यक त्या संख्येत अर्जदार न मिळाल्यास त्या पदाकरिता असलेली पात्रता (अनुभव व अहर्ता) आवश्यकते नुसार शिथील करण्यात येईल.

१३) अर्जदाराला कंत्राटी कालावधीत त्यांचे सोई नुसार ठिकाण बदलुन मिळण्याची मागणी करता येणार नाही.

१४) संगणकाचे ज्ञान आवश्यक (MS- CIT चे प्रमाणपत्र जोडण्यात यावे.)

१५) जालना जिल्हयाच्या www.jalna.nic.in या संकेत स्थळांवर जाहिरात प्रसिध्द करण्यात येत आहे.

१६) अ.क्र. १,३, व ४ पदांकरिता अर्जा सोबत उमेदवाराने अध्यक्ष, जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी, जि.प. जालना या नावे देय असलेला खुल्या प्रवर्गासाठी रु. ३००/- व मागासवर्गीय रु.१५०/- चा (ना परतावा) राष्ट्रीयकृत बॅंकेचा धनाकर्ष जोडावा. अ.क्र.२ पदांकरिता सदर धनाकर्ष जोडण्याची आवश्यकता नाही.

१७) अर्जदाराने अर्ज **A4** आकाराच्या कोऱ्या कागदावर करावयाचा असुन त्यामध्ये खालील बाबी अंतर्भुत कराव्यात.

अर्ज केलेल्या पदाचे नाव, ठळक अक्षरात स्वतःचे नाव, पासपोर्ट साईज फोटो,जन्मतारीख, जातीचा प्रवर्ग, अर्जदाराचा संपुर्ण पत्ता (पिन कोड सहीत) व दुरध्वनी क्रमांक.,ईमेल आयडी.

कामाचा अनुभव - काम केलेली संस्था, धारण केलेले पद, कालावधी, पदाची जबाबदारी व वेतन.

शैक्षणिक अर्हतेचा संपुर्ण तपशिल - अभ्यासक्रमाचे नाव, संस्था/विद्यापीठाचे नाव, उत्तीर्ण झाल्याचे वर्ष, गुणाची टक्केवारी, डी. डी. (राष्ट्रीयकृत बॅंकेचा) चा तपशील

आवश्यक कागदपत्रे

जन्मतारखेचा दाखला, शैक्षणिक अर्हता संबधी आवश्यक कागदपत्रे, जात प्रमाणपत्र, अनुभव प्रमाणपत्र इ. झेरॉक्स प्रती साक्षांकित करुन सोबत जोडावे, अपुर्ण अर्जाचा विचार केला जाणार नाही.

टिप : (*) उपरोक्त नमुद प्रत्यक्ष मुलाखत व कौशल्य चाचणीचे दिनांक व वेळ पात्र उमेदवारांना भ्रमणध्वनीद्वारे कळविण्यात येवुन कार्यालयीन नोटीस बोर्डवर पात्र उमेदवारांची यादी डंकविण्यात येईल याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

सदस्य सचिव
जि.ए.आ.कु.क सो.सा
तथा
जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद, जालना

अध्यक्ष
जि.ए.आ.कु.क सोसा
तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, जालना

# अर्जाचा नमुना

____________________ या पदासाठी ____________________या प्रवर्गातुन अर्ज सादर करण्यात येत आहे.

प्रति,
मा. अध्यक्ष जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी,
तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद जालना

अर्ज केलेल्या पदाचे नांव :

| उमेदवाराचा फोटो येथे चिटकवावा |
|---|

अर्जदाराचे नांव : ________________________

जातीचा प्रवर्ग : ____________ जात : ____________

अर्जदाराचा पत्रव्यवहाराचा संपुर्ण पत्ता पिन कोड सह : ______________________________

दूरध्वनी/मोबाईल क्रमांक :________________________(चालु स्थितीत असलेला मोबाईल क्रमांक नमुद करावा)

डि.डी. :-राष्ट्रीयकृत बॅकंचे नांव__________________ धनाकर्ष क्रमांक____________रक्कम__________

जन्म तारीख ______________ (जाहिरात प्रसिध्द तारखेस वय) : ______________

(लागु नसेल ते खोडावे)

- स्टाफ नर्स पदासाठी वैध एमएनसी प्रमाणपत्र जोडले आहे काय : होय/नाही

नोंदणी प्रमाण पत्र अथवा पावती असल्यास क्रमांक नोंदवावा :____________________

- वैद्यकिय अधिकारी या पदासाठी वैध एमएमसी प्रमाणपत्र जोडले आहे काय : होय/नाही

नोंदणी प्रमाण पत्र अथवा पावती असल्यास क्रमांक नोंदवावा :____________________

शैक्षणिक माहिती :________ (उच्च शैक्षणिक अर्हते नुसार खालील तक्तात नमुद करावे)

| अ.क्र. | पात्रता परिक्षेचे नांव | उत्तीर्ण वर्ष | बोर्डाचे/विद्यापीठाचे नांव | एकूण गुण | मिळालेले गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | | |
| २ | | | | | | |
| ३ | | | | | | |
| ४ | | | | | | |
| ५ | | | | | | |
| ६ | | | | | | |

अनुभव माहिती : एकूण................. वर्ष...........महिना.........दिवस

| अ.क्र. | शासकीय/ स्थानिक स्वराज्य संस्थेचे नांव | धारण केलेल पद | मिळणारे देय मानधन | नियुक्ती दिनांक | सोडण्याचे दिनांक | सोडण्याचे कारण | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | | | |
| २ | | | | | | | |
| ३ | | | | | | | |
| ४ | | | | | | | |

वर नमुद तक्तात दिलेली माहिती सर्वस्वी खरी असुन ती खोटी आढळल्यास त्यास मी स्वतः संपुर्ण जबाबदार असेल.

दिनांक :-

ठिकाण :-

उमेदवाराची स्वाक्षरी

## अर्जासोबत जोडवयाची सांक्षाकीत सत्यप्रतीची यादी

| | |
|---|---|
| १) शाळा/कॉलेज सोडल्याचा दाखला | होय/नाही |
| २) जात प्रमाणपत्र/जात वैधता प्रमाणपत्र | होय/नाही |
| ३) पदवी/पदवीकेचे गुणपत्रक | होय/नाही |
| ४) पदवी/पदवीकेचे प्रमाणपत्र (Degree Certificate) | होय/नाही |
| ५) पदव्युत्तर पदवी/पदवीकेचे गुणपत्रक | होय/नाही |
| ६) पदव्युत्तर पदवी/पदवीकेचे प्रमाणपत्र (Degree Certificate) | होय/नाही |
| ७) संगणक ज्ञान (MS-CIT) उत्तीर्ण प्रमाणपत्र | होय/नाही |
| ८) वैद्यकिय अधिकारी पदासाठी MMC, कौन्सिलचे प्रमाणपत्र | होय/नाही |
| ९) स्टाफ नर्स पदासाठी MNC, कौन्सिलचे प्रमाणपत्र | होय/नाही |
| १०) अनुभवाचे प्रमाणपत्र(शासकीय/एनएचएमचा अनुभव) | होय/नाही |
| ११) इतर आवश्यक कागदपत्रे नमुद करावे | होय/नाही |

(आशा स्वयंसेविका असल्यास, पुरावाखातर)